# <u>एनएचएसआरसीएल</u>

## <u>माहिती अधिकार कायद्याच्या (आरटीआय) कलम 4(1)(b) अंतर्गत तपशील</u>

**I. संस्था, एनएचएसआरसीएलचे संघटन, कार्य आणि कर्तव्ये यांचा तपशील**

ही माहिती वेबसाईटवर '<u>आमच्याबद्दल</u>' या शीर्षकाखाली उपलब्ध आहे.

**II. एनएचएसआरसीएलचे अधिकारी आणि कर्मचारी यांचे अधिकार आणि कर्तव्ये**

कंपनीचे अधिकारी आणि कर्मचारी कंपनीच्या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी / व्यवसायाच्या व्यवहारासाठी आवश्यक असलेले विविध उपक्रम पार पाडतात. हे अधिकार आणि कर्तव्ये प्रामुख्याने त्यांच्या कामाचे स्वरूप, नियुक्तीच्या अटी आणि शर्ती, आणि कंपनीअंतर्गत अधिकारांचे प्रत्यायोजन यावर अवलंबून आहेत.

**III. पर्यवेक्षणाच्या आणि उत्तरदायित्वाच्या प्रणालींसह निर्णय घेण्याच्या प्रक्रियेमध्ये अवलंबलेली कार्यपध्दती**

<u>संचालक मंडळाची रचना आणि निर्णय घेताना अवलंबलेली पध्दत</u>

संचालक मंडळ

⇩

व्यवस्थापकीय संचालक

⇩

कार्यकारी संचालक

⇩

ईडी, जीएम आणि कार्यकारी प्रमुख व अधिकारी

एनएचएसआरसीएल ही भारत सरकार, महाराष्ट्र सरकार आणि गुजरात सरकार यांच्यामध्ये अनुक्रमे 50:25:25 प्रमाणात भांडवली सहभाग असलेली एक संयुक्त उपक्रम म्हणून स्थापित झालेली कंपनी आहे.

कंपनीचे व्यवस्थापन संचालक मंडळातर्फे (बीओडी) केले जाते ज्यामध्ये कार्यकारी संचालक आणि सरकारने नामनिर्देशित केलेल्या संचालकांचा समावेश आहे. बीओडी ही निर्णय घेणारी कंपनीची सर्वोच्च यंत्रणा असून कंपनीच्या संस्थापन घटनापत्र आणि नियमावलीच्या अधीन राहून तिला ते सर्व अधिकार वापरण्याचा आणि, कृती व गोष्टी करण्याचा हक्क आहे, जो अधिकार कंपनी कायद्याअंतर्गत कंपनीला आहे.

भागधारकांच्या हिताचे संरक्षण करणे आणि त्यांचा लाभांश वाढवणे ही बोर्डाची मुख्य विश्वासाधिष्ठित जबाबदारी आहे. कंपनीच्या कामकाजाचे व्यवस्थापन करून सर्व हितसंबंधी तसेच व्यापक समाजाच्या अपेक्षा पूर्ण होतील हे बोर्ड सुनिश्चित करते.

कंपनीच्या दैनंदिन व्यवस्थापनाची जबाबदारी व्यवस्थापकीय संचालकांची (एमडी) आहे ज्यांना सध्या चार कार्यकारी संचालका सहाय्य करतात, ते म्हणजे प्रकल्प संचालक, वित्तीय संचालक, रोलिंग स्टॉक संचालक आणि विद्युत व यंत्रणा संचालक. सर्व कार्यकारी संचालक बीओडीला उत्तरदायी आहेत.

कंपनी कायदा आणि कंपनी संस्थापन नियमावलीच्या कलम 146 च्या अधीन राहून, संचालक मंडळाला बजावता येतील असे अधिकार व्यवस्थापकीय संचालकांकडे सोपवण्यात आले आहेत. व्यवस्थापकीय संचालकांना त्यांचे अधिकार, कंपनीचे कार्यकारी संचालक/ अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याकडे सोपवण्याचा अधिकार आहे.

**IV. कंपनीची कार्ये पार पाडण्यासाठी कंपनीने बनवलेले नियम**

कंपनीने जरी काही विशिष्ट नियम बनवले नसले तरी, प्रकल्प आणि त्याच्याशी संबंधित समस्यांना त्वरित हाताळण्यासाठी प्रयत्न केले जातात.

**V. कंपनीची कार्ये पार पाडण्यासाठी कंपनीकडे असलेले किंवा तिच्या नियंत्रणात असलेले किंवा तिचे कर्मचारी वापरत असलेले नियम, कायदे, सूचना, माहिती पुस्तिका आणि नोंदी**

कंपनीचे कर्मचारी त्यांची कार्ये पार पाडण्यासाठी खालील नियम, कायदे, माहिती पुस्तिका आणि नोंदींचा वापर करतात:

- भारतीय रेल्वे कायदा 1989
- संस्थापन घटनापत्र आणि नियमावली
- संस्थापनेशी सबंधित कागदपत्रे
- लेखांकन धोरणे
- लेखांकन मानके
- सुसाध्यता अहवाल (फिजिबिलिटी रिपोर्ट)
- आरेखन आणि रचना विनिर्देश
- परिमाणांची अनुसूची (एसओडी)
- कराराच्या शर्ती
- निविदा कागदपत्रे
- तांत्रिक तपशील

**VI. कंपनीकडे किंवा कंपनीच्या नियंत्रणात असलेल्या कागदपत्रांच्या वर्गवारीविषयी निवेदन**

कंपनीकडे किंवा कंपनीच्या नियंत्रणात खालील कागदपत्रे आहेत:

- संस्थापन घटनापत्र आणि नियमावली
- संस्थापनेशी सबंधित कागदपत्रे
- कंपनी कायद्या अंतर्गत कायदेशीर नोंदवह्या
- वार्षिक अहवाल
- वार्षिक विवरण
- कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयामध्ये भरलेले विवरणपत्र आणि फॉर्म्स
- वार्षिक वित्तीय विवरणपत्र
- लेखापरीक्षक अहवाल
- लेखा पुस्तके

- आयकर विवरणपत्र आणि संबंधित कागदपत्रे
- निविदा कागदपत्रे
- विनिर्देश आणि रेखाचित्रे
- सुसाध्यता अहवाल आणि तांत्रिक तपशील
- पुरवणी – पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन अहवाल
- सामाजिक प्रभाव मूल्यांकन (एसआयए) / पुनर्वसाहत कृती योजना (आरएपी) अहवाल
- स्थानीय जन योजना (आयपीपी) अहवाल

**VII. धोरणे तयार करण्याविषयी किंवा त्यांच्या अंमलबजावणीविषयी जनतेच्या सदस्यांशी सल्लामसलत करण्याकरिता, किंवा त्यांच्या प्रतिनिधित्वाकरिता, काही व्यवस्था अस्तित्वात असल्यास त्याचा तपशील**

पुनर्वसन आणि पुनर्वसाहत याकरिता कंपनीने संरेखनाने प्रभावित गावांमधील हितसंबंधितांशी सल्लामसलत करण्याची व्यवस्था केली आहे. सामाजिक प्रभाव मूल्यांकन (एसआयए), पुनर्वसाहत कृती योजना (आरएपी) अहवाल, स्थानीय जन योजना (आयपीपी) अहवाल वेबसाईटवर प्रकाशित केला आहे.

**VIII. घटक म्हणून किंवा सल्ला घेण्याकरिता दोन किंवा त्याहून अधिक व्यक्तींचा समावेश असलेली मंडळे, परिषदा, समित्या आणि इतर मंडळे आणि अशी मंडळे, परिषदा, समित्या आणि इतर मंडळे यांच्या बैठका जनतेसाठी खुल्या आहेत की नाही, किंवा अशा बैठकांचे कार्यवृत्त जनतेला उपलब्ध आहे की नाही याविषयी निवेदन**

कंपनीच्या संस्थापन नियमावलीनुसार, संचालक मंडळामध्ये किमान तीन आणि कमाल पंधरा संचालक असू शकतात.

कंपनीच्या विद्यमान संचालक मंडळाची सदस्यसंख्या नऊ आहे आणि त्यामध्ये पाच कार्यकारी संचालकांचा समावेश आहे, ते म्हणजे व्यवस्थापकीय संचालक, प्रकल्प संचालक, वित्तीय संचालक, रोलिंग स्टॉक संचालक आणि विद्युत व यंत्रणा संचालक; आणि भारत सरकारने नामनिर्देशित केलेले तीन अर्ध-वेळ अधिकृत संचालक (अध्यक्षांसहित) आणि गुजरात सरकारने नामनिर्देशित केलेले एक अधिकृत संचालक.

विद्यमान संचालकांची यादी खाली दिली आहे:

| | |
|---|---|
| 1 | श्री. विनोदकुमार यादव<br>अध्यक्ष रेल्वे बोर्ड व अर्धवेळ पदसिद्ध अध्यक्ष, एनएचएसआरसीएल |
| 2 | श्री. अचल खरे<br>व्यवस्थापकीय संचालक, एनएचएसआरसीएल |
| 3 | श्री. राजेंद्र प्रसाद<br>प्रकल्प संचालक, एनएचएसआरसीएल |
| 4 | श्री. अरुण बिजलवान<br>वित्त संचालक, एनएचएसआरसीएल |
| 5 | श्री. विजय कुमार,<br>रोलिंग स्टॉक संचालक, एनएचएसआरसीएल |

| | |
|---|---|
| 6 | श्री. संदीप कुमार,<br>संचालक विद्युत व यंत्रणा, एनएचएसआरसीएल |
| 7 | श्री. रविंद्र नाथ सिंह<br>अर्ध-वेळ (अधिकृत) संचालक, एनएचएसआरसीएल आणि पीईडी / इन्फ्रा / रेल्वे बोर्ड |
| 8 | श्रीमती. अंजू रंजन<br>अर्ध-वेळ (अधिकृत) संचालक, एनएचएसआरसीएल आणि कार्यकारी संचालक (वित्त खर्च- I) / रेल्वे बोर्ड |
| 9 | श्री. प्रभातकुमार रमणलाल पटेलिया,<br>अर्ध-वेळ (अधिकृत) संचालक, एनएचएसआरसीएल आणि मुख्य अभियंता (राष्ट्रीय महामार्ग) आणि अपर सचिव, रस्ते व इमारती विभाग, गुजरात सरकार |

<u>मंडळाच्या समित्या - कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी समिती</u>

कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी समितीची विद्यमान रचना आहे:

1 श्रीमती. अंजू रंजन -- अध्यक्ष
अर्ध-वेळ (अधिकृत) संचालक

2 श्री. राजेंद्र प्रसाद -- सदस्य
संचालक प्रकल्प, एनएचएसआरसीएल

3 श्री. अरुण बिजलवान -- सदस्य
वित्तीय संचालक, एनएचएसआरसीएल

संचालक मंडळ आणि त्याच्या समित्यांच्या बैठका जनतेसाठी खुल्या नाहीत.

## IX. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची निर्देशिका

निर्देशिका वेबसाईटवर उपलब्ध आहे.

## X. कंपनीच्या अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना मिळणारे मासिक वेतन, कायद्यातील तरतुदींनुसार असलेल्या भरपाईच्या यंत्रणेसहित

सध्या कंपनी, औद्योगिक महागाई भत्त्याअंतर्गत (आयडीए) समाविष्ट असलेल्या कर्मचाऱ्यांना तिसऱ्या वेतन सुधार समितीच्या (अनुसूची ‘A’ कंपन्यांना लागू) शिफारसीनुसार वेतन देते आणि केंद्रिय महागाई भत्त्याअंतर्गत (सीडीए) असलेल्या कर्मचाऱ्यांना सातव्या केंद्रिय वेतन आयोगाच्या अहवालाच्या शिफारसीनुसार वेतन देते.

त्यानुसार, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन खालीलप्रमाणे आहे:

| अ.क्र. | पद | वेतनश्रेणी (आयडीए) - तिसरी पीआरसी |
|---|---|---|
| 1 | व्यवस्थापकीय संचालक | 2,00,000-3,70,000 |
| 2 | संचालक | 1,80,000-3,40,000 |
| 3 | कार्यकारी संचालक | 1,50,000-3,00,000 |
| 4 | महाव्यवस्थापक | 1,20,000-2,80,000 |
| 5 | अपर महाव्यवस्थापक | 1,00,000-2,60,000 |

| अ.क्र. | पद | वेतनश्रेणी (आयडीए) - तिसरी पीआरसी |
|---|---|---|
| 6 | सहमहाव्यवस्थापक | 90,000-2,40,000 |
| 7 | उप-महाव्यवस्थापक | 80,000-2,20,000 |
| 8 | वरिष्ठ व्यवस्थापक | 70,000-2,00,000 |
| 9 | व्यवस्थापक | 60,000-1,80,000 |
| 10 | सहाय्यक व्यवस्थापक | 50,000-1,60,000 |
| 11 | वरिष्ठ अधिकारी | 40,000-1,40,000 |
| 12 | अधिकारी | 30,000-1,20,000 |

| अ.क्र. | पद | वेतनश्रेणी (सीडीए) | |
|---|---|---|---|
| | | सहावा सीपीसी | सातवा सीपीसी |
| 1 | वरिष्ठ प्रशासकीय श्रेणी (एसएजी) | जीपी-10000 | स्तर 14, 144200-218200 |
| 2 | निवड श्रेणी (एसजी) | जीपी-8900 | स्तर 13A, 131100-216600 |
| 3 | निवड श्रेणी (एसजी) | जीपी-8700 | स्तर 13, 123100-215900 |
| 4 | कनिष्ठ प्रशासकीय श्रेणी (जेएजी) | जीपी-7600 | स्तर 12, 78800-209200 |
| 5 | वरिष्ठ वेतनश्रेणी (एसएस) | जीपी-6600 | स्तर 11, 67700-208700 |
| 6 | कनिष्ठ वेतनश्रेणी आणि गट “B” | जीपी-5400 आणि 4800 | स्तर 08, 09, आणि 10 47600-151100, 53100-167800 आणि 56100-177500 |
| 7 | वरिष्ठ पर्यवेक्षक इ. | जीपी-4600 | स्तर 07, 44900-142400 |
| 8 | पर्यवेक्षक | जीपी-4200 | स्तर 06, 35400-112400 |
| 9 | तंत्रज्ञ इ. | जीपी-2800 | स्तर 05, 29200-92300 |

वार्षिक वेतनवाढ मूळ वेतनाच्या 3% आहे. याव्यतिरिक्त, लागू भत्ते आणि प्रतिपूर्ती, रजा, सेवानिवृत्ती लाभ, भविष्यनिर्वाह निधि इ. देखील कंपनीच्या नियमांनुसार ग्राह्य आहेत.

**XI. सर्व योजनांचे तपशील, प्रस्तावित खर्च आणि केलेल्या वितरणाचे अहवाल यांच्या उल्लेखासह कंपनीच्या प्रत्येक एजन्सीसाठी मंजूर झालेली आर्थिक तरतूद.**


एनएचएसआरसीएलच्या इतर कोणत्याही एजन्सी नसल्यामुळे, इथे कुठलाही तपशील दिलेला नाही.

**XII. सबसिडी (अर्थसहाय्य) कार्यक्रमांच्या अंमलबजावणीची पध्दत, मंजूर रक्कम आणि अशा कार्यक्रमांच्या लाभार्थींचा तपशील यांच्यासहित**

कंपनीच जनेतकरिता कोणताही सबसिडी कार्यक्रम नाही.

कंपनीची स्थापना महाराष्ट्र राज्य आणि गुजरात राज्य आणि/किंवा इतर कोणत्याही प्रदेशांना जोडणाऱ्या हाय स्पीड रेल्वेची अंमलबजावणी करण्यासाठी झाली आहे.

मुंबई शहर, महाराष्ट्र आणि अहमदाबाद शहर, गुजरात यांना जोडणारी हाय स्पीड रेल्वे जपान सरकारच्या सहयोगाने सुरू करण्यात येत आहे. या प्रकल्पाचा अंदाजे खर्च साधारण रू. 1,08,000 कोटी आहे (रूपये एक लाख आठ हजार कोटी).




**XIII. मंजूर सवलती, परवानग्या किंवा अधिकृतता प्राप्तकर्त्यांचे तपशील**

कंपनीने कोणत्याही सवलती, परवानग्या किंवा अधिकृतता दिलेल्या नाहीत.

**XIV. कंपनीकडे उपलब्ध असलेल्या किंवा संक्षिप्तपणे इलेक्ट्रॉनिक स्वरूपात ठेवलेल्या माहितीच्या संदर्भात तपशील.**

खालील कागदपत्रे कंपनीच्या वेबसाइटवर इलेक्ट्रॉनिक स्वरुपात उपलब्ध आहेत:

- व्यवहार्यता अहवाल
- तांत्रिक तपशील
- पूरक - पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन अहवाल
- सामाजिक प्रभाव मूल्यांकन (एसआयए) / पुनर्वसाहत कृती योजना (आरएपी) आणि स्थानीय जन योजना (आयपीपी) अहवाल
- प्रस्तावित मार्ग नकाशा
- मागवलेल्या आणि प्रदान केलेल्या निविदा
- वार्षिक अहवाल

**XV. सार्वजनिक वापरासाठी ठेवले असल्यास, वाचनालय किंवा वाचन कक्षाच्या कामकाजाच्या वेळांसह माहिती मिळवण्यासाठी नागरिकांना उपलब्ध असलेल्या सुविधांचे तपशील.**

इच्छित माहितीसाठी कंपनीच्या www.nhsrcl.in या संकेतस्थळाचा संदर्भ घेतला जाऊ शकतो. जरी इच्छित माहिती वेबसाईटवर उपलब्ध नसेल तर श्री. निशंक भानु, एएम / कम्युनिकेशन यांच्या नावे लेखी अर्ज करून ती मागता येईल. जर इच्छित माहिती उपलब्ध असेल आणि देता येणे शक्य असेल तर ती योग्य वेळेत देण्यात येईल.

माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये, भारताच्या कोणत्याही नागरिकाला कोणतीही माहिती मिळवण्याची इच्छा असल्यास तो जन माहिती अधिकारी (पीआयओ) / सहाय्यक जन माहिती अधिकारी (एपीआयओ) यांना उद्देशून लेखी विनंती करू शकतो. जनतेच्या सोयीसाठी "नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेडचा आरटीआय अर्ज कसा भरायचा" याची लिंक कंपनीच्या वेबसाईटवर 'आरटीआय' या शीर्षकाखाली दिलेली आहे.

सर्वसामान्य जनतेसाठी कंपनीकडे कोणतीही वाचनालय सुविधा उपलब्ध नाही.

**XVI. केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्यांची नावे, पदे आणि इतर तपशील**

जन माहिती अधिकारी (पीआयओ) / सहाय्यक जन माहिती अधिकारी (एपीआयओ) / अपील प्राधिकारी यांचे संपर्क तपशील कंपनीच्या वेबसाइटवर 'आरटीआय' या शीर्षकाखाली देण्यात आले आहेत.